स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 04–01–2017** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या विशेष सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **3.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| **4.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **5.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **6.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| **7.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| **8.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| **9.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| **10.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| **11.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **12.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **13.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **14.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| **15.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 931:–</u>
{लोककर्म झोन 04}

प्रभाग क्र. 51 तकीया धंतोली येथे बिरसा मुंडा सभागृहाचे बांधण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. आर्यन कन्स्ट्रक्शन हयांची 10.01% कमी दराची निविदा रूपये 32,74,652/–(रूपये बत्तीस लक्ष चौ–यात्तर हजार सहाशे बावन रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक 624(A42901371341) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 932ः–</u> नागपूर शहर वाहतुक पोलीस, दक्षिण व पश्चिम झोन
{वाहतूक विभाग} अंतर्गत चौकात झेब्रा क्रॉसींग व स्टॉप लाईन, थर्मोप्लॉस्टीक पेन्टीगचे पट्टे मारने या कामास्तव प्राप्त तीन निविदापैकी मे. कॅटेलाईन कन्स्ट्रक्सन टेक्नॉलॉजी प्रा.ली. यांची प्राकलनीय दरापेक्षा १८.९० प्रतिशत ने कमी दरांची रू. ३२,५२,२९१/— रकमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच या कामाकरीता रू. ४७७.६८/— प्रती चौ.मी. अर्थात १८.९० टक्केनी सी.एस.आर. दरापेक्षा कमी दराने वर्षभराकरीता दर निश्चित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 933ः–</u> नागपूर शहर वाहतुक पोलीस, उत्तर, इंदोरा, एम.आय.डी.
{वाहतूक विभाग} सी. व पूर्व झोन अंतर्गत चौकात झेब्रा क्रॉसींग व स्टॉप लाईन, थर्मोप्लॉस्टीक पेन्टनी पट्टे मारने या कामास्तव प्राप्त तीन निविदापैकी मे. कॅटेलाईन कन्स्ट्रक्सन टेक्नॉलॉजी प्रा.ली. यांची प्राकलनीय दरापेक्षा १८.९० प्रतिशत ने कमी दराची रू. २९,२२,९३६/— रकमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच या कामाकरीता रू. ४७७.६८/— प्रती चौ.मी. अर्थात १८.९० टक्केनी सी.एस.आर. दरापेक्षा कमी दराने वर्षभराकरीता दर निश्चित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 934ः–</u> "महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांमधे तसेच विविध
{विद्युत विभाग} इमारतींमधे उर्जा संवर्धनाचे अनुषंगाने अस्तित्वात असलेले पंखे व लाईटस्, एनर्जी एफिशियंट पंख्यांनी व एल.ई.डी. लाईटस् ने बदलणे" या कामाकरीता चौथ्या वेळेस निविदा बोलाविल्या असता प्राप्त एकूण आठ निविदाकारांनी दिलेल्या दरांचा विचार करता या आठ निविदाकारांमधील एक निविदाकार मे. साधना इलेक्ट्रीक वर्क्स, नागपूर यांनी आयटम रेट नुसार द्यावयाच्या दरांमधे आयटम क्र. १.०१ करीता दिलेला दर प्राकलनीय दराच्या तुलनेत ६०.६०% ने कमी असल्याने व या निविदाकाराने दिनांक २६/१२/२०१६ च्या पत्रान्वये हा 'चुकीने' दर दिलेला असल्याने त्यांची निविदा ग्राहय धरु नये अशी विनंती केलेली असल्याचा विचार करता व इतर निविदाकारांपैकी या आयटम क्र. १.०१ करीता दिलेला निम्नतम दर ०.१८% ने कमी आहे याचा विचार करता

आयटम क्र. १.०१ करीता ६०.६६% ने कमी दर देणा-या निविदाकारांची रु. २.३८ लक्ष ची अनामत रक्कम जप्त करुन त्यांची निविदा रदद् करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा व या आयटम क्र. १०१ वगळता इतर सर्व आयटम्स करीता या निविदेत प्राप्त झालेल्या सुधारीत निम्नतम दरांवर सातही निविदाकारांनी काम करण्याची तयारी दर्शविली असल्याचे अनुषंगाने आयटम क्र. १.०१ वरील निम्नतन दर हा ६०.६०% ने कमी असा या निविदेमधे प्राप्त झालेला असल्याचा विचारात घेता फक्त आयटम क्र. १.०१ करीता फेर निविदा बोलाविण्यास व (आयटम क्र. १.०१ ) हा दर वगळता इतर सर्व निम्नतम दर मंजूर करण्यास, व या निम्नतम दराने हे काम खालील सर्व निविदाकारांमधे शक्यतो समप्रमाणात विभागुन देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवून

१) मे. निशांत ईलेक्ट्रीकल्स, नागपूर.
२) मे. सोनु ईलेक्ट्रीकल्स, नागपूर.
३) मे. दत्त ईलेक्ट्रीकल्स, नागपूर.
४) मे. लिंक एन्टरप्रायझेस, नागपूर.
५) मे. राहुल कंस्ट्रक्शन्स, नागपूर.
६) मे. अनिल ईलेक्ट्रीकल्स ॲन्ड असोशीएटस्, नागपूर.
७) मे. बालाजी असोशीएटस्, नागपूर.

**तसेच वरीलप्रमाणे निम्नतम दरानुसार प्राकलनीय राशी रु. १,४७,३६,४८९ च्या तुलनेत १.०७ % ने कमी असलेल्या निविदा राशी रु.१,४५,७७,६६२ च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा** प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 935:— {प्रकल्प विभाग} दक्षिण—पश्चिम मतदार संघातील प्रभाग क्र. ५५ येथील तात्या टोपे नगर, साहस कॉलनी, अत्रे ले—आऊट, हेडगेवार लॉयब्ररी, नरगुंदकर ले—आऊट उद्यानात विविध कामे करणे या कामाकरिता राशी रु. ७३,७०,१९६/— रकमेच्या कामास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१६/प्र.क्र. ३०४/न.वि.—१६ दि. ३०.११.२०१६ नुसार प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त निम्नतम निविदा मे. आर.एस. नायडु यांची १२.८५% कमी दर राशी रु. ६४,२३,१२६/— च्या निम्नतम निविदेला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 936:— {कार्य. अभि. स्लम} नागपूर शहरात ''स्वच्छ भारत अभियाना'' अंतर्गत शहर हागणदारी मुक्त करण्याकरिता मोबाईल टॉयलेटची व्यवस्था त्वरील करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. गो ग्रिन सोलुशन प्रा. लि. यांची प्राकलनिय दरापेक्षा १.५०% टक्के ने कमीवर असलेली रू. ६७,९६,५००/— (सदुसष्ट लक्ष, छयान्नव हजार, पाचशे फक्त) रकमेची निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 937:— {स्थावर विभाग} स्थावर विभाग, महानगरपालिका कार्यालयातील संपुर्ण अभिलेखांचे दीर्घ काळ जतन करण्याचे व या अभिलेख नस्त्यातील पृष्ठांची दुरुस्ती करणे, संगणकीय स्कॅनींग करणे, अभिलेखाचा तात्काळ शोध घेण्याचे दृष्टीने योग्य सॉफ्टवेअर मार्फत सर्व अभिलेखांचा तपशील संगणकात नोंदविणे इत्यादी कामाकरीता रु. ४३३८४५२/—चे खर्चास मंजुरी प्रदान करणे व हे काम यापुर्वी कर व कर आकारणी विभागाकडील अभिलेख स्कॅनींग कामाकरीताचे निविदाकार मे. डेकोफर्न कन्स्ट्रक्शन यांचे स्वीकृत दर रु. १.३०/— प्रती पृष्ठ (सर्व प्रकारच्या मापाचे पृष्ठ) दराने मे. डेकोफर्न कन्स्ट्रक्शन यांचे कडून करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 938:— {प्रकल्प विभाग} दक्षिण—पश्चिम मतदार संघातील विविध उद्यानात व मैदानात ग्रीन जीम साहित्य बसविणे या कामाकरिता राशी रु. ८२,३८,०९७/— रकमेच्या कामास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१६/प्र.क्र. ३०४/न.वि.—१६ दि. ३०.११.२०१६ नुसार प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त निविदाचे वाटाघाटी द्वारे दर कमी करण्यास आल्यानुसार निम्नतम निविदा मे. सॅमसन इंडस्ट्रिज प्रा.लि. नाशिक यांची १.२५% कमी दर राशी रु. ८१,३५,१२१/— च्या निम्नतम निविदेला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 939:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 68 'ब' मध्ये चिंचभवन स्म''ाान घाटामध्ये विविध प्रकारची उर्वरित स्थापत्य कामे करण्यास्तर प्राप्त निविदांपैकी मे. आर.एस. नायडु यांची प्राकलनिय दरापेक्षा ०.९९९९% टक्के ने कमीवर असलेली रू. ९१,२७,२५७/— (एक्यान्नव लक्ष, सत्तावीस हजार, दोनशे सत्तावन फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न तसेच सदरहू बांधकाम महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास या योजने अंतर्गत प्रस्तावित केलेला असून शासकिय निधी प्राप्त झाल्यास देयक त्यामधून पारित करण्याचे मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 940:–</u> नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गतील
{शहर अभियंता} पॅकेज–07 मधील (1) रस्ता क्र. 10–अ संजुबा हायस्कुल ते महाकाळकर सभागृहापर्यंत (2) रस्ता क्र. 10–ब, महाकाळकर सभागृह ते गजानन शाळा टी पॉईंट पर्यंत (3) रस्ता क्र. 34 सिध्देश्वर सभागृह ते राजकमल चौका पर्यंत (4) रस्ता क्र. 39– अयोध्यानगर ते बसेश्वर पुतळया पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉक्रिट चा तयार करण्यास्तव फेर निविदा बोलाविण्यात आल्या असता विभागास प्राप्त मे. पी. के. नगरारे. यांची एकमेव प्राकलनीय दरापेक्षा 6.65 टक्के कमी दराची निविदा, विभागाव्दारे करण्यात आलेल्या दर वाटाघाटी नंतर, प्राकलनीय दरापेक्षा 8.20 टक्के कमी दराच्या रू. 15,55,37,589/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 941:–</u> डीग डिस्पेंसरी धरमपेठ येथे BOT तत्वावर दवाखाना व मार्केट
{कार्य. अभि. प्रकल्प} बांधकामाचा प्रस्ताव.

1. मौजा गाडगा, नगर भूमापन क्र. 318, शीट क्र. 17, या जागेवर 'डीग डीस्पेन्सरी व जलप्रदाय कार्यालय' आहे व मालमत्ता पत्रकात मुळ धारक महाराष्ट्र सरकार व इतर भार मध्ये मनपा नागपूर – फ्री ग्रॅंट शाळा व दवाखाना अशी नोंद आहे. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत जागेचा वापर "सार्वजनिक / निम सार्वजनिक" असा दर्शविलेला आहे. महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 नूसार सदर जागेचा वापर 'नागरी सुविधा केंद्र व व्यापारी संकूल' असा बदल करण्याचा प्रस्ताव आवश्यक कार्यवाही करुन सहाय्यक संचालक, नगर रचना, मनपा यांनी दि. 03/07/2003 ला मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविण्यात आला आहे.
2. कार्यकारी अभियंता, (प्रकल्प) मनपा यांचे पत्र क्र. 203/कार्य.अभि.(प्रकल्प) दि. 22/12/2015 नूसार उपरोक्त प्रस्ताव मंजूरीकरीता कार्यवाही करण्याची विनंती, नगर विकास विभागास करण्यात आली आहे.
3. सहाय्यक संचालक, नगर रचना, मनपा यांचे पत्र क्र. मनपा/नरवि/38 दि. 07/04/2016 नूसार मा. संचालक, नगर रचना, पुणे यांना या संदर्भांत अहवाल कागदपत्रांसह सादर करण्यात आला आहे.
4. उपरोक्त फेरबदल प्रस्तावाची मंजूरी प्रलंबीत आहे.
5. सदर स्थळी BOT प्रकल्प राबविण्याकरीता महानगरपालिकेचे सन 2012–13 चे अंदाजपत्रकात प्रकल्प राबविण्याकरीता महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त आहे. सन 2016–17 च्या अर्थ संकल्पातील पद क्र. A 22801322807 (बांधा वापरा हस्तांतरित करा प्रकल्पांचा आराखडा तयार करण्यासाठी व्यय पद) वरील खर्च अंतर्गत सदर प्रकल्प अंतर्भुत करावा लागेल.
6. श्री. मिलींद सोहोनी, ब्रेन ट्रस्टर्स, कंन्सलटंट यांनी त्यांचे दि. 15/03/2016 चे मा. महापौर यांना सादर केलेल्या पत्रात धरमपेठ येथील डीग दवाखाना व इंदिरा गांधी रुग्णालय पी.पी.पी. तत्वावर विकास करण्याबाबत सल्लागार (Transaction Advisor म्हणून) सहभागी होण्याची विनंती केली आहे.
7. तसेच त्यांचे दि. 02/11/2016 चे मा. मुख्य अभियंता, मनपा यांना उद्देशून लिहीलेल्या पत्रात त्यांची डीग दवाखाना, धरमपेठ व इंदिरा गांधी रुग्नालय, गांधीनगर करीता सल्लागार (Transaction Advisior) म्हणून नियुक्ती करण्याची विनंती केली आहे. तसेच त्यांचे दि. 08/11/2016 चे मा. आयुक्त यांना लिहीलेल्या पत्रानुसार मनपाच्या नियम व धोरणानूसार प्रकल्पाची मंजूरीची कार्यवाही विकासक नियुक्त होवून कार्यारंभ आदेश निर्गमीत होईस्तव पूर्ण होईपर्यंत ज्यामध्ये फीजीबीलीटी रिपोर्ट, आरएफपी, इतर पूर्व निविदा कार्यवाही (Pre Tender Activity) करीता मोबदला घेणार नाहीत असे नमूद केले आहे.

8. सदर पत्रात त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर तसेच विकासक/Concessioner यांचे सोबत करारनामा (Agreement) वर स्वाक्षरी झाल्यानंतरच त्यांना मोबदला (Fees) देण्यात यावा, सदर मोबदला हा महानगरपालिकेच्या आता प्रचलीत धोरणानूसार म.न.पा. परिपत्रक क्र. –मनपा/मु. अ/49/2016 दि. 28/03/2016 Circular No. प्रकल्प सल्लागाराचा मोबदला घेण्यास तयार आहेत.

9. सदर सल्लागार पत्र क्र. 427/न.य/2016 दि. 20/02/2016 अन्वये म.न.पा. च्या पैनलवर सल्लागार म्हणून नोंदणीकृत आहेत.

10. या विषयावर वारंवार विविध स्तरांवर चर्चा झाली असता विकासकाची नियुक्ती होईस्तोवर, सदर सल्लागार सदध्या कूठलाही मोबदला न घेता काम करण्यास तयार असल्याने व सदर प्रकल्प सुसाध्य झाल्यास व रितसर निविदेद्वारे विकासकांचा प्रतिसाद व निवड पूर्ण झाल्याच्या प्रक्रियेनंतरच मोबदला घेण्यास तयार असल्याने, सदर सल्लागारास खलील अटींवर या प्रकल्पासाठी काम करण्यास संधी देण्यास हरकत नाही.

   i. जागेच्या वापरात महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम 1966, कलम 37 नूसार फेरबदलाचा प्रस्ताव प्रलंबीत आहे. जर सदर मंजुरी नकारार्थी प्राप्त झाली किंवा प्राप्तच झाली नाही किंवा मंजुरी मिळण्यास फार विलंब झाला अश्या परिस्थितीत सल्लागार (Transaction Advisor) कोणतेही (claim) दायित्व करणार नाही.

   ii. जर सल्लागाराने सादर केलेला प्रकल्प अहवाल सुसाध्यता अहवाल म.न.पा. तर्फे अस्विकाराहार्य असेल किंवा म.न.पा. च्या हिताचे नसेल तर अस्विकृत होईल किंवा मान्य होणार नाही व त्याबाबत सल्लागारामार्फत कोणतेही दाईत्व तयार होणार नाही.

   iii. सदर प्रकल्प अहवाल सादर करण्यापूर्वी लागणारे Statutory Compliances जसे नगर रचना विभागाकडुन नागपूर शहरासाठी मंजुर विकास नियमावलीनुसार प्रकल्प संकल्पनास मान्यता घेणे, जागेच्या मालकीची खातरजमा करणे, जागेच्या क्षेत्रफळाची खातरजमा करणे, तसेच अग्निशमन विभाग, म.न.पा. विभागाची मंजुरी हया बाबी प्रकल्प अहवाल करताना अंतर्भुत राहतील.

**कामाचे स्वरूप व व्याप्ती.**

- Preparation of Pre-feasibility study of the project;
- Detailed Techno-Commercial Feasibility & Appraisal on approval of the Draft FSR;
- Preparation of Layout Plan and Financial Modeling with various scenarios for the Project Development;
- RFQ/RFP Document, legal and financial vetting thereof;
- DCA and Finalization of Concession Agreement;
- Assisting in Pre bid meeting;
- Assistance in selection of suitable private partner(s)/ Developer(s) through a transparent and competitive process;
- Preparation of concession agreement document and it's legal and financial vetting.
- Preparation of Bid Evaluation Report on the basis of the shortlisted bids;
- Execution of Concession Agreement;
- Assistance in Financial Closure of the Project, as may be required;
- Preparation of Tender document for appointment of PMC, appointment and Recommendation on PMC.

म.न.पा. अधिनियमाचा परिशिष्ठ 5 प्रकरण 2 पुढे दिलेल्या परंतुका नुसार बिना निविदा काम दयावयाचे झाल्यास स्थायी समितीची मंजूरी घ्यावी असा नियम आहे.

उपरोक्त बाबीचा विचार करता सध्यास्थितीत सल्लागाराने सदर प्रकल्पाचे पूर्व निविदा प्रक्रिया व विकासकाची नियुक्ती पूर्ण होईस्तव कोणतेही भुकदान किंवा मोबदला न मागण्याचे स्वताहुन कळविल्यामुळे व ज्यामुळे

म.न.पा वर सध्यास्थिती कोणताही आर्थिक बोजा येत नसल्यामुळे तसेच विकासकाची नियुक्ती झाल्यानंतर आता प्रचालीत म.न.पा. धोरणाप्रमानेच शुल्क मान्य असल्यामुळे मे. ब्रेन ट्रस्टर यांना प्रथम Pre tender activity करिता कोणताही मोबदला न घेता प्रकल्पासाठी कंत्राटदार नियुक्ती होईपर्यंत काम करण्यास संधी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 942</u>:—** मौजा—गोरेवाडा, खसरा क्र. ५०, येथिल आबादितील व **{स्थावर विभाग}** शासन मालकीतील एकुण २.४४ हे. आर जागेपैकी ८१४.०० चौ.मी. जागा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत स्वास्थ केंद्राचे बांधकामाकरीता, महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७८ (१) नुसार जागा संपादनाकरीता मान्यता प्रदान करण्यास व संपादनाची कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.सुरेश जग्यासीः— मा.सभापती महोदय, आजके दैनिक लोकमत समाचार मे अपना नागपूर मे फ्रंट पेज पर सिमेंट रोड के संदर्भ युनिटी इंन्फ्राटेक कंपनीने मॉडेल मिल से लेकर गणेशपेठ चौक तक सिमेंट रोड बनाया है। जहा अप्रोचेस रोड है वहा मुरम डालकर खड्डे बुजाऐ गयें है। लेकीन मुरम डालने के बाद भी हेवी ट्राफिक उस रोडसे जाने की वजह से बार बार खड्डे हो रहें है। उस संदर्भ मे कायमस्वरुपी कारवाई की जायें।

श्रीमती दिव्या धुरडे :— मा.सभापती महोदय, बर्डी येथील लोहापुलाच्या समोर शितलामाता मंदीराजवळ ओ.सी.डब्लु. चे खोदकाम सुरु असल्यामुळे मोठया प्रमाणात खड्डे निर्माण झाल्यामुळे जातीने लक्ष देण्यात यावे.

सभापती :— मा.सदस्यांचे म्हणने बरोबर आहे दर सहा महिन्यात त्या ठिकाणी ओ.सी.डब्लु. कडुन कोणते ना कोणते खोदकाम सुरु असते याबाबत ओ.सी.डब्लु. कंपनीशी चर्चा करुन कायस्वरुपी तोडगा काढण्यात यावा.

श्री.सुरेश जग्यासी :— मा.सभापती महोदय, ओ.सी.डब्लु. के काम पर अंकुश होणा चाहिये, अपने अधिकारी और उनके कर्मचारी मे किसी भी प्रकार का कोऑर्डीनेट नही ओ.सी.डब्लु. के जो अनस्कील्ड कर्मचारी है उनको अंडर ग्राउंड पाणी लाईन के बारे मे कोई जानकारी नही रहती, अपने डेलीगेट के एन.ओ.सी देने के बाद ओ.सी.डब्लु. को पेमेंट देना चाहियें।

<u>ठराव क्रमांक 943</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर